REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 3 | DECEMBER – 2017

# अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील स्त्रीवाद व स्त्रीवादी विचारसरणी

प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.

**प्रस्तावनाः-**

समाजाच्या प्रारंभापासुन पुरुष वर्गाने आपल्या शारीरीक सामर्थ्याच्या बळावर शतकानुशतकेस्त्रीयांवर निरंकुश वर्चस्व गाजवलेले आहे आणि हा त्यांचा अधिकारच आहे या समजुतीने स्त्रीयांना त्यांच्या अधिकारांपासुन वंचित ठेवले आहे व तिला गुलाम बनवुन ठेवले आहे त्यातुनच स्त्रीवाद हा विचार पुढे आला. स्त्रीवाद मुख्यतः स्त्रीयांच्या हक्काशी निगडीत असून स्त्री-पुरुष संबंधातुन व पुरुषी वर्चस्वातुन स्त्री हक्काच्या निर्माण झालेल्या समस्येवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो.
स्त्रीवादाचे साधारणतः दोन अर्थ सांगितले जातात त्यामध्ये
१) आदर्शवादी संबंधाचा :- स्त्री-पुरुष संबंध हे आदर्श स्वरुपाचे आहेत असं यात मानल जातं. कथा, कादंबऱ्यामध्येही ते दाखवलेले आहे व साहित्यातही त्याचा उल्लेख आढळतो.
२) ऐतिहासिक संबंधाचा :- यात पुरुषाने सतत वर्चस्व दाखवुन स्त्रीयांना दुय्यम स्वरुपाची वागणुक दिलेली आहे व स्त्रीला गुलाम ठरविले आहे. या विरोधात स्त्रीयांनी काळाने कधी-कधी बंड करुन धार्मिक व नैतिक दृष्ट्या पुरुषांशी समान वागणुकीची मागणी केलेली आहे व त्यातुनच 'स्त्रीवाद' हा विचार पुढे आला.[१]

## १. स्त्रीवादाची ऐतिहासिक पार्श्वभुमी :-

'Feminism' हा शब्द लॅटिन भाषेतील 'Femina' या शब्दापासून तयार झालेला आहे. Femina हा शब्द स्त्रीयांचे गुण दर्शवितो. १८९० मध्ये Womenism च्या ऐवजी Feminism हा शब्द वापरण्यात आला. Womenism हा शब्द म्हणजे लैंगिक समानतेचा सिध्दांत आणि स्त्रीयांच्या हक्काची चळवळ या अर्थाने हा शब्द वापरला जात होता.[२]

Alice Rose यांनी २७ एप्रिल १८९५ मध्ये अथेनियम या नियतकालीकात ग्रंथ परीक्षण लिहीतांना, Feminism हा शब्द वापरला. हा लिंगभेद न मानता स्त्री-पुरुष समानतेवर विश्वास ठेवणारा विचार आहे. स्त्रीवाद ही एक चळवळ असून ती मुख्यतः स्त्री हक्काशी संबंधीत आहे. स्त्रीवादातून स्त्रीयांचे गौणत्व त्यांचे विश्लेषण स्पष्टीकरण याचबरोबर, स्त्रीयांची दुय्यमता कशी दूर करता येईल, यावर प्रकाश टाकणारा विचार आहे. स्त्रीत्वामुळे स्त्रीला दुय्यमत्व मिळते, त्यातूनच अन्यायकारक वागणुक मिळते. याला कुटूंब व समाजातील पितृसत्ताक व्यवस्था हे त्याचे मुळ, कारण आहे असे मानले जाते.[३]

## २. स्त्रीवादाची चळवळ :-

१९६० पर्यंत राजकीय दृष्ट्या भेद हे अभावाने केले जात होते, म्हणजेच जैविक आधारावर, शारिरीक रचनेवर कामे स्त्री-पुरुषांवर टाकली व विभाजन केले. स्त्री-पुरुष संबंधातील परस्पर विरोधाने स्त्रीवादी चळवळ निर्माण झाली. "आपल्यावर केलेल्या जुलुमाविरुध्द स्त्रीने केलेला प्रतिकार, प्रतिवाद म्हणजेच स्त्रीवाद होय."[४] पुरुषांनी स्त्रीयांवर हक्क, वर्चस्व प्रथापित केले, त्यातूनच या चळवळीस राजकीय स्वरुप प्राप्त झाल्याचे दिसून येते.

एक मानव प्राणी म्हणून स्त्रीयांना सामाजिक, आर्थिक, वैधानिक आणि राजकीय हक्क, अधिकार असावेत असे मानले जाते. परंतु त्यापुढे जाऊन स्त्रीयांना मालमत्ता कायदा, राजकीय क्षेत्र, वैवाहिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक संधी यासंबंधी पुरुषांच्या बरोबरीने समानता असण्याची हमी देऊन लिंग भेदावर आधारीत सर्व बंधने आणि नियंत्रण काढून टाकली गेली पाहिजेत अशी स्त्रीवाद्यांची मागणी व भूमिका आहे.

## ३. स्त्रीवादाच्या व्याख्या :-

### जॅकी स्टेसी :-

Introducing women studies मध्ये An Tangaling Feminist Theory या लेखामध्ये त्या म्हणतात की, "विशेष अनुभवाचे विश्लेषण करुन दुय्यमत्व समजावून घेऊन शोषण नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजेच स्त्रीवाद होय."५ ही एक ज्ञानशाखा आहे.

### ऑक्सफर्ड डिक्शनरी :-

'स्त्रीवाद' जागतिक स्त्रीयांच्या हितार्थ स्थितीकडे पाहण्याचा एक मार्ग आहे. ज्याचा मुख्य उद्देश पितृसत्ताकपध्दतीत सामाजिक, आर्थिक, राजकीय संस्थांच्या माध्यमातून स्त्रीयांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्या व्यवस्था असल्याने 'स्त्रीवाद' हा पितृसत्ताक पध्दतीवरील टीका आहे तर दुसऱ्या बाजुला स्त्रीमुक्तीची बांधिलकी मानणारी विचारप्रणाली आहे. स्त्रीयांची संख्या ही आर्धी आहे तेंव्हा स्त्रीयांच्या संपुर्ण सहभागाशिवाय कोणताही सामाजिक विकास होणार नाही.[६] वरील मतातून स्त्री वादविषयी भूमिका अत्यंत प्रकटपणे व्यक्त केल्याचे दिसून येते.

## ४. स्त्रीवादाचा उगम आणि विकास :-

वंश निर्मीती व वंश सातत्यामध्ये स्त्रीची भूमिका एक मादी म्हणून राहिलेली आहे. जगात स्त्रीयांचा दर्जा व स्थान भिन्न वेगवेगळे आहे. पारंपारिक समाजामध्ये स्त्रीया पुरुषांपेक्षा बौध्दिक, शारिरीक दृष्ट्या कमकुवत आहेत, असा समज आहे. इंग्लंडमध्ये Comman Law मध्ये कायद्याने स्त्रीयांवर कडक निर्बंध घातलेले होते. त्यामध्ये William Backe stone याने १८ व्या शतकात Comentries of Laws of England या ग्रंथात स्त्रीयांच्या कायदेशीर दुय्यमत्वावर भर दिला. त्यामध्ये विवाहानंतर स्त्रीला कायदेशीर अस्तित्व राहत नाही, हा सिध्दांत अमेरिकेतही स्वीकारलेला होता. त्यामुळे स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करुन तिला न्याय, हक्क मिळवुन देण्यासाठी जो लढा उभारला त्यातूनच स्त्रीवादाचा उदय झाला.[७] वरील मतातून जागतिक पातळीवर स्त्रीयांना मूलभूत हक्कासाठी प्राप्ती करुन देण्याचा प्रयत्न कसा झाला याचे वास्तव स्वरुप स्पष्ट होते.

## ५. जगातील विविध देशातील स्त्रीवादी चळवळी :-

स्त्रीवादाच्या संदर्भात जगाच्या विविध प्राचीन संस्कृतीत विचार, व्यक्त झालेले दिसतात. त्यामध्ये 'Khristyle D.Pizanez' च्या 'The city of Ladies-१४०५' मध्ये प्रकाशित झालेला हा ग्रंथ स्त्री चळवळीच्या बाबतीत पूर्वीचे भाकित व आधुनिक स्त्रीवादाची कल्पना देणारा ठरला. १८ व्या शतकाच्या शेवटी स्त्रीया ह्या निम्म्या आहेत हे जाणून स्त्री प्रश्नासंबंधी आवाज उठविला व नैतिक, बौध्दिक आणि सुधारणावादी अशा सर्व क्षेत्रात समान अधिकाराची मागणी केलेली आहे.

### इंग्लंडमधील स्त्रीवाद :-

फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात, ब्रिटनमध्ये स्त्री हक्काची चळवळ जोर धरत होती. ही स्त्रीवादी चळवळीची पहिली लाट म्हणून ओळखली जाते - Merry woulsten craft - १७५९-९७ यांनी 'A Vinditation of the right of women' या प्रसिध्द ग्रंथात आपले विचार मांडले ही प्रारंभिक समर्थक म्हणून मानली जाते.[८]

ऑलंपी ड्रॅग्स याने 'Declaration of the Rights of womens' या ग्रंथातून स्त्रीवादावर प्रकाश टाकले आहेत. Woulsten craft म्हणते समाजामध्ये जाणीवपूर्वक स्त्रीयांचे अधिकार व स्वातंत्र्य पध्दतशीरपणे नष्ट केलेले आहे. हा अधिकार पुरुषांना कोणी दिला हा प्रश्न विचारुन भेद नष्ट करण्याची मागणी करते. त्यामध्ये १) धार्मिक नैतिकदृष्ट्या स्त्रीची प्रतिष्ठा ही राखली गेली पाहीजे. २) स्त्रीयांची स्थितीसुधारण्यासाठी त्यांना शिक्षण देणे आवश्यक आहे. ३) स्त्रीयांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे अशा प्रकारच्या मागण्या केल्या. - William Thomson यांनीही या चळवळीला महत्वाचे योगदान दिले. त्याच्या मतानुसार स्त्रीयांचे आर्थिक, सामाजिक स्वातंत्र्य, सुरक्षितता, मुलांची जबाबदारी, गरोदरपणातील स्वास्थ्य व स्त्रीयांना काम मिळवून देण्याची मागणी केलेली आहे. भांडवलशाहीच्या विरोधात स्त्रीवादाला उठाव देणारा हा पहिला विचारवंत म्हणून मानला जातो. Lidia Baker ने १८६७ मध्ये पार्ल मेंटच्या सदस्यत्वासाठी नाव नोंदवण्याचा प्रयत्न केला परंतु तिचे नाव हे नोंदवले गेले नाही. १८८० नंतर या चळवळीस खरा वेग आला कारण याच काळामध्ये समाजवादी चळवळ प्रभावित झाली होती त्यात समता दर्शविली होती.[९] वरील मतातून स्त्रीयांच्या अंधकात्मथ जीवनाला मानवीमूल्याची, लोकशाहीमूल्याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

### फ्रान्स मधील स्त्रीवाद :-

१८ व्या शतकातील American & French या ऐतिहासिक राज्यक्रांत्यामुळे स्त्री चळवळीला स्फुर्ती व प्रेरणा मिळाली. नेपोलियन बोनापार्टच्या हुकुमशाहीच्या काळात जी कायदे संहिता तयार केली, त्यातही स्त्रीयांना दुय्यमत्व देण्यात आले होते. Charls Forier याने स्त्रीयांनी राजकीय, सामाजिक क्षेत्रात भाग घेण्यासाठी त्यांच्या शिक्षणावर भर दिला, अन्यायाबद्दल उदासिन असलेल्या उच्चवर्गीय स्त्रीयांची हेटाळणीकरुन त्यांच्यावर टीका झालेली होती.

**अमेरिका आणि स्त्रीवाद :-**

१८४८ मध्ये सिनेका फॉल्स सम्मेलनात सिनेका फॉल्स जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला. त्या जाहीरनाम्यामध्ये

१. संपत्तीचा वाटा
२. घटस्फोटाचा हक्क
३. व्यवसाय स्वातंत्र्य
४. समाधानकारक वेतन
५. कामाच्या ठिकाणी निरोगी वातावरण

अशा मागण्या १८९० मध्ये सर्व स्त्री संघटनांनी एकत्र येऊन केल्या. त्यानंतर "National American Women Sufrez Associations" ही संघटना स्थापन केली व मताधिकार यासाठी संघर्ष केला व साधारणतः १९२० मध्ये स्त्रीयांना मतदानाचा अधिकार मिळाला व जगभर या घटनेचा प्रभाव पडू लागला. १९२०-३० मध्ये युरोपातील महामंदीच्या लाटेमुळे चळवळीकडे दुर्लक्ष झाले. परंतु १९५० नंतर यास पुन्हा महत्व प्राप्त झाले. बेंटी फ्रीडमन यांच्या नेतृत्वाखाली अमेरिकेच्या १२ घटक राज्यातील ३२ स्त्रीवादी नेत्या एकत्र आल्या व "National organization of womens"-१९६६ ची स्थापना केली. ही संघटना पुढील उद्देशांनुसार काम करु लागली.

१) समान हक्कांसाठी घटना दुरुस्ती.
२) नोकऱ्यामध्ये लिंगभेद करणाऱ्या कायद्याला विरोध.
३) बाळंतपणाची रजा व बालसंगोपण केंद्राची स्थापना.
४) स्त्रीयांच्या संतती नियमनाच्या हक्काचे संरक्षण.
५) समान व्यवसाय, शिक्षण.

इत्यादी प्रकारच्या मागण्या या संघटनेने मांडल्या हीच संघटना पुढील काळात फुटली व यातुन एक गट बाहेर पडला व त्या गटाने Feminist ही संघटना स्थापना केली.[१०] वरील मतातून जागतिक पातळीवर स्त्रीवादी चळवळीची आणि संघटनेची जडणघडण कसी होत गेली हे स्पष्ट होते म्हणून भारतातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

**भारतातील स्त्रीवाद :-**

वेदोत्तर काळात स्त्रीयांना गुलाम या प्रकारचे स्थान होते. परंतु "यत्र नर्यस्तुः पुज्यते रम्मते तत्र देवता." अशाप्रकारे तिची पूजाही केली जाते. असे अपवाद असत. भारतात स्त्री ही केवळ उपभोग्य वस्तु आणि प्रजोत्पादनाचे साधन म्हणून तिचा वापर केला जात होता. मुस्लिम समाजामध्ये आजही स्त्रीयांना दुय्यमत्व दिले जाते, त्यात बुरखा पध्दत, ड्रेसकोड, पडदा पध्दत इ. प्रकारचे दुय्यमत्व देऊन अन्यायकारक वागणूक दिली जाते. हे भारतीय समाज जीनातील वास्तव आपल्याला नाकरता येतनाही. त्यासाठी स्त्री सुधारणावादी विचारधारेची जाणीव भारतीय समाजव्यवस्थेत निर्माण होणे मला महत्वाचे वाटते.

पुर्वी भारतात स्त्री संदर्भात चांगलाच समान अधिकार होता, विषमता कोठेच नव्हती हा काळ रामायण, महाभारतापर्यंत येतो. सिंधु संस्कृती, उपनिषदे, पुराण यांमध्ये स्त्रीयांचा दर्जा उच्च होता हे स्वातंत्र्य रामायणाच्या मध्यापर्यंत सीतेच्या अपहरणापर्यंत होते. त्यानंतर सीतेवर शंकास्पद नजरेने पाहण्यात येऊ लागले स्त्रीला फक्त उपभोगाचे साधन समजून चार भिंतीत बंदिस्त करुन ठेवण्यात येऊ लागले व पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुषांस बहुपत्नीत्वाचा अधिकार देण्यात आला.[११]

इ.स.पुर्व ६०० नंतर भारतावर परकीयांनी आक्रमण केले. मुस्लिमांनी आर्यांना पराभूत करुन सत्ता प्रस्थापित केली व येथील स्त्रीयांचा वापर मोठ्या प्रमाणात करुन घेतला कारण त्यांनी आपल्या सोबत स्त्रीया आणल्या नव्हत्या त्यांनी येथीलच स्त्रीयांशी विवाह केले याच काळात बालविवाह प्रथा सुरु झाली ब्रिटीश काळाच्या आगोदर विधवा स्त्री अपशकुन मानली जावु लागली म्हणून सतीची प्रथा सुरु झाली व पुरुषप्रधान संस्कृती आरुढ झाली. स्त्रीयांचे शिक्षण, संपत्ती, जीवनाचे अधिकार काढून घेतले परंतु यात कोणत्याही राज्यकर्त्याने हस्तक्षेप केला नाही व स्त्रीवरील अत्याचार आणि अनिष्ठ प्रथा सुरु झाल्या.[१२] वरील मतातून भारतीय समाजामध्ये स्त्रीयांना मान-सन्मान दिला जात होता, परंतू कर्मड परंपरेमुळे कालांतराने स्त्रीयांना गुलाम कसे केले गेले याचे वास्तव स्पष्ट केल्याचे दिसून येते.

भारतात ब्रिटीशांचे आगमन झाले, त्यांनी श्रीमंत लोक, राजे-रजवाडे यांच्यासोबत तह, करार केला. स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला. अनिष्ठ प्रथांचे उच्चटण केले व सुधारणेवर भर दिला. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार झाला व विचारवंत व समाजसुधारक निर्माण होऊन, सामाजिक चळवळी अस्तित्वात आल्या. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. राजस्थान, उत्तरप्रदेश, बिहार, प.बंगाल येथे सतीची चाल मोठ्या प्रमाणात होती. महाराष्ट्रात राजा रायमोहन रॉय यानी ही प्रथा बंद केली व स्त्री सुधारणेचे एक पर्व सुरु झाले, त्यानंतर लाल, बाल, पाल, लोकहितवादी, म.फुले, म.गो.रानडे, म.कर्वे हे आद्य क्रांतीकारक म्हणून ओळखले जातात, त्यांनी अनेक अनिष्ठ प्रथांना विरोध करुन त्या बंद करण्यासाठी कायदे करुन घेतले व स्त्रीयांना सन्मान व दर्जा देऊन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले व शिक्षणावर भर दिलेले आहेत. त्यानंतरच्या काळात स्त्रीचळवळी सुरुच राहिल्या व म.गांधी यांनी आपल्या चळवळीमध्ये स्त्रीयांना सामावुन घेतले. स्वातंत्र्य लढ्यात स्त्रीयांचा सहभाग वाढवला.[१३]

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर संविधानामध्ये मोठ्या प्रमाणात स्त्री आरक्षण देण्यात आले. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व इतरही अधिकार स्त्रीला कायद्याने बहाल करण्यात आले, अशा प्रकारे स्त्री सबलीकरणाकडे वाटचाल होताना, आपणास दिसून येते व आज तर स्त्री-पुरुष समानता अस्तित्वात येताना दिसून येते.

आज विज्ञानयुगात स्त्रीयांच्या सबलीकरणासाठी अनेक कायदे आहेत. साहित्यीक व प्रसारमाध्यम स्त्री प्रश्नाविषयी जन-जागरण करीत आहेत. स्त्रीमुक्ती संघटनांची स्थापना झालेली आहे. स्त्रीने पुरुषाबरोबरीचे किंबहुना त्याहीपेक्षा आपले कर्तव्य श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले आहे, तरी देखील आजही समाजामध्ये स्त्रीचे गुदमरलेपणा आणि छळ हा विचार करायला लावणारा विषय बनला आहे. आजही अशा किती तरी स्त्रीया आहेत की, ज्या सामाजिक रुढी, परंपरांची बंधने स्वीकारुन निमूटपणे अन्याय सहन करीत आहेत. परंतु अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कथा साहित्यातून जी सामाजिक रुढी, परंपराची बंधने नाकारणारी स्त्री चित्रित केली ती त्या काळातील सर्व सामान्य स्त्रीपेक्षा नव्हेतर त्याकाळातील सुशिक्षित उच्चवर्णीय स्त्रीपेक्षाही ही स्त्री वेगळी होती व पुढच्या काळाशी नाते सांगणारी होती हे आपल्याला मान्य करावे लागते.

## सारांश

अण्णाभाऊंच्या एकूण लेखनातील वेश्या, मुरळी, नाची, कामगार इ. रुपात स्त्रियांच्या समस्या ज्या अण्णाभाऊ साठेंनी मांडलेल्या आहेत याचा आढावा घेण्यात आलेला असून या समस्या सोडविण्यासाठी अण्णाभाऊंच्या लेखनातील स्त्रीवाद हा स्त्री जीवनाबद्दल माफक अपेक्षा व्यक्त करणारा आहे याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यानंतर पारंपारिक जीवन जगणाऱ्या स्त्रीया व परंपरेला छेद देणाऱ्या स्त्रीया अशा दोन वर्गामध्ये अण्णाभाऊंनी मांडलेला स्त्रीवादी दृष्टीकोण मांडण्यात आलेला आहे. स्त्रियांच्या दुर्बलतेमुळे विविध क्षेत्रामध्ये स्त्रियांवर होणारे अत्याचार आणि त्यास प्रतिकार करुन सामाजिक संदेश देणाऱ्या व्यक्तिरेखा अण्णाभाऊंनी उभ्या केलेल्या आहेत

## संदर्भ सुची :-


1. www.en.wikipedia.org/wiki/feminism
2. www.britarlica/topic/wemons-movument
3. Sahay sudhama, 'womon and Empowerment : Apprgaches and Stadegien, Discovery Publishing House, New Delhi-1998 Page No.37
4. डॉ.गोटे शुभांगी, 'महिला सबलीकरण; स्वरुप व समस्या,
5. पाटील लिला, भारतातील स्त्री जीवन, मेहता पब्लीकेशन हाऊस, पुणे-१९९० पृ.क्र.०९
6. तत्रैव- पृ.क्र. १०
7. साखरे सिमा, 'स्त्रीवाद', सिमा प्रकाशन, नागपूर- पृ.क्र. १६
8. Phadnis Urmila and Malani Indiara, Womens of the world; ''Illusion and Reality'' Vikas Publishion House Pvt. Ltd. New Delhi, 1978 P.No. 89
9. Ibid, P.No.93
10. Ibid, P.No.174
11. पाटील लिला, 'भारतीय स्त्री जीवन, पुर्वोक्त, पृ.क्र. ४१
12. www.mashable.com/gender-eguality - thonght- Leader
13. www.en.wikipedia.org/wiki/feminism,
    www. mashable.com/gender-eguality - thonght- Leader
    www.britarlica/topic/wemons-movument